## निवडक



बोर्डे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करताना ज्ञानेश्वर वारखंडकर. बाजूला मान्यवर.

### भीमशक्ती सामाजिक संघटना गोवा राज्यकडून बोर्डे येथे प्रजासत्ताक दिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २** : भीमशक्ती सामाजिक संघटना – गोवा राज्यच्या वतीने डिचोली बोर्डे येथील आपल्या दलित वस्तीमध्ये भारतीय प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम मंडळाच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी विचार मंचावर भीमशक्तीचे प्रदेशाध्यक्ष ज्ञानेश्वर वारखंडकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष जानवी जगन्नाथ परवार, डिचोली तालुका अध्यक्ष आनंदी सगुण परवार व गोवा भीमशक्ती महिला सरचिटणीस अर्चना अविष परब आदी उपस्थित होत्या. मंचावर प्रदेशाध्यक्ष वारखंडकर यांनी प्रजासत्ताक आणि डॉ. बाबासाहेब या विषयावर आपल्या साध्या सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. अर्चना परब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाला की, अठरा वर्षांनी जो आपल्याला डॉ. बाबासाहेबांनी मतदानाचा हक्क /अधिकार दिला तो दिवस म्हणजे आनंदाचा दिवस आहे. तर तालुका अध्यक्ष आनंदी परवार यांनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंगांना वाचा फोडत म्हणाल्या की, बाबासाहेबांना हिणवत असताना लोक म्हणत असे होते की, शिकून तुम्ही काय करणार शेवटी तुम्हाला ढोलच वाजवायचा आहे. त्यावर बाबासाहेबांनी म्हणाले की, मी ढोल असा वाजवणार की साऱ्या जगात त्याचा नाद घुमेल. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याला मान्यवराच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. यावेळी देवानंद पालयेकर, संतोष साळकर, संजना कांदोळकर, जानवी परवार, जिया तोरसकर, तुळशीदास धारगळकर, रेश्मा हरमलकर, आनंदी परवार, दत्तगुरु आरोस्कर, अर्चना परब, अष्टमी परब, गिरिश फडते, ग्रीशा फडते, रामू जाधव, वंशिता तोरस्कर, शुभांगी धारगळकर, जगन्नाथ पवार, सुजल पवार आणि नामदेव धारगळकर व बोर्ड येथील ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष परवार यांनी तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन नामदेव धारगळकर यांनी केले.

---



पिलार : खेळाडूंना बक्षिसे वाल्मिकी मिनेझिस. बाजूला इतर.

### झिटो आर्चरी क्लबाच्या विद्यार्थ्यांकडून प्रजासत्ताक दिवस साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २** : झिटो आर्चरी क्लबाने भारताचा ७६ींह प्रजासत्ताक दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला.यावेळार झिटो आर्चरी क्लबाचे प्रशिक्षक झिटो गुदिन्हो यांनी वेगवेगळ्या वयोगटांतील आर्चरीच्या खेळाडूंना वेगवेगळ्या अंतरावरून बाण मारण्याच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धा फादर आग्नेल सेन्ट्रल स्कुल पिलारच्या मैदानावर पार पडल्या. अंडर ९, अंडर १४, अंडर १७ च्या खेळाडूंनी तसेच अन्य नागरिकांनी स्पर्धेत भाग घेत आपली नजर व शक्तिचे प्रदर्शन लोकांसमोर घडविले.

फादर जेकब शेली यांच्या विजयी आर्चेरी खेळाडूंचे कौतुक करीत त्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थानी अभ्यासाबरोबर फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, धनुर्विद्या आणि इतर खेळ खेळून शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त व्हावे सांगीतले. सन्माननीय पाहुणे वाल्मिकी मिनेझिस त्यांनी खेळाडूंचे कौतुक केले आणि त्यांना बक्षिसे दिली. प्रशिक्षक झिटो गुदिन्हो, सहाय्यक प्रशिक्षक लिओनार गुदिन्हो, फादर जेकब शेली आणि वाल्मिकी मिनेझीस व्यासपीठावर उपस्थित होते. ४८ धनुर्विद्या विद्यार्थ्यांनी १० मीटर, १५ मीटर, २० मीटर आणि २५ मीटर अंतरावरील लक्ष्यांमधील रंगीत वर्तुळात बाण मारून पदके जिंकली.फादर जेकब शेली हे प्रमुख पाहुणे होते आणि वाल्मिकी मिनेझी हे सन्माननीय पाहुणे होते.विजयी धनुर्विद्या खेळाडूंना बक्षिसे देण्यात आली. प्रशिक्षक झिटो गुदिन्हो यांनी स्पर्धेत सहभागी झाल्याबद्दल सर्व तिरंदाजी खेळाडूंचे आभार मानले.

---

### साळ येथील स्थलपुरूष देवस्थानचा उद्या वर्धापनदिन व रथसप्तमी उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २** : साळ येथील श्री स्थलपुरूष देवस्थानचा वर्धापनदिन व रथसप्तमी उत्सव मंगळवार दि. ४ रोजी विविध कार्यक्रमांनिशी साजरा केला जाणार आहे. शुक्रवारी सकाळी ९ वाजल्यापासून श्री स्थलपुरुष मंदिरात देवतापूजन, १० वाजता लघुरुद्र, अभिषेक, ११.३० वाजता सौ. रुपाली व श्री. आत्माराम यशवंत राऊत या दाम्पत्याच्या यजमानाखाली श्री सत्यनारायण महापूजा, पुराण वाचन, आरती, तीर्थप्रसाद तसेच दुपारी १.३० वाजता महाप्रसाद होणार आहे. संध्याकाळी श्रवणीय भजनाचा कार्यक्रम होणार आहे. संध्याकाळी ७ वाजता ही भूमिका मंदिरात बारा अंधाराचा अवसार (भार) आल्यानंतर ही भूमिका मंदिराकडून श्री सिद्धेश्वर मंदिर (वरचावाडा) येथपर्यंत अवसारांच्या साथीने ढोल–ताशाच्या गजरात श्रींची पालखी मिरवणूक निघणार आहे. त्यानंतर परतीच्या मार्गावर ठिकठिकाणी गावातील सुवासिनी व भाविकांकडून श्रीची खणा–नारळाने ओटी भरण्याचा कार्यक्रम होणार असून या पालखीचे श्री भूमिका मंदिरात पुनरागमन झाल्यानंतर ही स्थलपुरूष देवस्थान रंगमंचकावर देवेंद्र नाईक प्रस्तुत चेंदवणकर दशावतारी नाट्य मंडळी – चेनवणकडून शिवभक्त शबर हा बहारदार दशावतारी नाट्यप्रयोग सादर केला जाईल.

---

### सचिन तेंडुलकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

**मुंबई, दि. २** : मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला कर्नल सीके नायडू जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सचिन तेंडुलकरने हा पुरस्कार स्वीकारताना बीसीसीआयचे आभार मानले. मुंबईत बीसीसीआयच्या नमन पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यासाठी भारताचे अनेक आजी–माजी खेळाडू उपस्थित होते. या पुरस्कार सोहळ्यात २०२३–२४ या मोसमात आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेट गाजवणाऱ्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. सचिनला आयसीसीचे अध्यक्ष आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष जय शाह यांच्याकडून हा खास पुरस्कार प्रदान करण्यात आला. सचिनला हा खास पुरस्कार देताना सर्व उपस्थितांनी उभं राहून त्याचे कौतुक केलं. याशिवाय बीसीसीआयने सचिनसाठी एक खास व्हीडिओ देखील तयार केला होता. जो पुरस्कार प्रदान करण्यापूर्वी दाखवण्यात आला. यावेळी त्याने जुन्या आठवणींना उजाळा दिला. भारत आणि इंग्लंड संघात रविवारी (२ फेब्रुवारी) मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर टी २० मालिकेतील शेवटचा सामना होणार आहे. त्यामुळे दोन्ही संघ मुंबईत असल्याने या दोन्ही संघातील सदस्यही पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी उपस्थित होते.

# अभिषेक शर्माने रचला इतिहास..!

## भारताने इंग्लंडविरुद्ध पाचवा टी–२० सामना १५० धावांनी जिंकत मालिका ४–१ ने जिंकली

**मुंबई, दि. २ :**



इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या टी–२० सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २४७ धावांची मोठी धावसंख्या उभारली आहे. टीम इंडियासाठी अभिषेक शर्मा या सामन्यात स्टार खेळाडू ठरला. त्याने भारतासाठी दुसरे सर्वात जलद शतक झळकावले. यादरम्यान अभिषेक शर्माने अनेक मोठे विक्रम आपल्या नावे केले आहेत. याशिवाय त्याने असा विक्रम आपल्या नावे केला आहे, जो टीम इंडियासाठी यापूर्वी कोणीच केला नाही.

अभिषेक शर्माने डावाच्या सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी केली. त्याने अवघ्या १७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. यानंतर अभिषेकने अवघ्या ३७ चेंडूत आपले शतक पूर्ण करत दुसरे सर्वात जलद शतक करण्याचा विक्रम केला. पॉवरप्लेमध्येच अभिषेकने ५८ धावा केल्या होत्या. तो टी–२० सामन्याच्या पॉवरप्लेमध्ये भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा खेळाडू बनला आणि त्याने यशस्वी जैस्वालचा विक्रम मोडला. यापूर्वी, जैस्वालने २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी–२० सामन्याच्या पॉवरप्लेमध्ये ५३ धावा केल्या होत्या.

दहाव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर इंग्लंडने आपला आठवा विकेट गमावला. शिवम दुबेने जेकब बेथेलला बाद केले. बेथेलला % चेंडूत फक्त १० धावा करता आल्या. दुबेने फिल सॉल्टलाही पॅव्हेलियनमध्ये पाठवले.

अभिषेक शर्मा ९व्या षटकात गोलंदाजी करायला आला. त्याने पहिल्याच चेंडूवर ब्रायडन कार्सला झेलबाद केले. त्यानंतर पाचव्या चेंडूवर जेमी ओव्हरटनलाही पॅव्हेलियनमध्ये पाठवले. कार्स फक्त ३ धावा करू शकला, ओव्हरटनने १ धाव केली. अभिषेकच्या पाचव्या चेंडूवर कर्णधार सूर्यकुमार यादवने एक शानदार झेल घेतला. येथे अभिषेकने जेमी ओव्हरटनला फूल लेंथचा चेंडू टाकला. त्याने मोठा शॉट खेळला, पण चेंडू बॅटच्या बाहेरील कडेला लागला आणि शॉर्ट कव्हरवर उभ्या असलेल्या सूर्यकुमार यादवकडे गेला. तो मागे धावला आणि डायव्हिंग कॅच घेतला.

### सर्वाधिक धावा करणारे भारतीय फलंदाज

अभिषेक शर्मा– ५८ धावा
यशस्वी जैस्वाल– ५३ धावा
रोहित शर्मा– ५१ धावा
केएल राहुल– ५० धावा

### भारतासाठी टी–२० मध्ये सर्वात मोठी वैयक्तिक धावसंख्या

अभिषेक शर्माने इंग्लंडविरूद्ध पाचव्या टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ५४ चेंडूत १३५ धावा केल्या आहेत, ज्यात त्याने ७ चौकार आणि १३ षटकार लगावले आहेत. यासह, तो एका टी–२० सामन्यात भारतीय संघासाठी सर्वात मोठी खेळी खेळणारा फलंदाज बनला आहे आणि त्याने शुबमन गिलचा विक्रम मोडला आहे. गिलने २०२३ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध १२६ धावांची इनिंग खेळली होती. आता अभिषेकने हा विक्रम मागे टाकला आहे.

### सर्वात मोठी खेळी खेळणारे फलंदाज

अभिषेक शर्मा– १३५ धावा
शुभमन गिल – १२६ धावा
रुतुराज गायकवाड–१२३ धावा
विराट कोहली– १२२ धावा
रोहित शर्मा– १२१ धावा

### अभिषेक शर्माने मोडला रोहित शर्माचा विक्रम

अभिषेक शर्माने १० षटकारांच्या मदतीने त्याच्या कारकिर्दीतील सर्वात जलद शतक तर भारतासाठी दुसरे सर्वात जलद शतक झळकावले. यानंतर अभिषेकने १३५ धावांच्या खेळीत १३ षटकार लगावले. यापूर्वी रोहित शर्माने एका टी–२० डावात सर्वाधिक १० षटकार लगावले होते. रोहित शर्मानंतर कोणत्यात खेळाडूला ही कामगिरी करता आली नव्हती. आता अभिषेक शर्माने रोहितचा हा विक्रम मोडित काढला आहे.




अस्नोडा : आपा शेट तनावडे यांच्याकडून जेतेपदाचा चषक स्वीकारताना बाबा इलेव्हन संघाचे खेळाडू. बाजूला मान्यवर.

# क्रिकेट स्पर्धेचे बाबा इलेव्हनला जेतेपद

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २** : काणक्या – म्हापसाच्या बाबा इलेव्हन संघाने अंतिम सामना खेळला. यजमान राष्ट्रोळी बॉईजचा रोमहर्षक लढतीत पराभव करीत पहिल्या अखिल गोवा पंचायत व नगरपालिका मर्यादित टेनिस चेंडू क्रिकेट स्पर्धेचे अजिंक्यपद प्राप्त केले. भंडारवाडा येथील राष्ट्रोळी बॉईज आयोजित केलेली ही स्पर्धा मारोडा येथील मैदानावर खेळविण्यात आली.

प्रथम फलंदाजी करताना बाबा इलेव्हन संघाने ५ षटकात ४६ अशी धावसंख्या उभारली प्रतीउत्तरात खेळताना राष्ट्र संघाला ४२ धावापर्यंतच मजल मारता आली. विजेत्या व उपविजेत्या संघाला रोख रक्कम व आकर्षक चषक प्रदान करण्यात आला. अंतिम सामनावीर – चंद्रकांत रायकर, उत्कृष्ट गोलंदाज – धनेश आपटे, उत्कृष्ट फलंदाज– रजत कुडाळकर व मालिकावीर पुनाजी कळंगुळकर (सायकल) यांची वैयक्तिक बक्षिसासाठी निवड करण्यात आली.

बक्षीस वितरण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून समाज सेवक आपा शेट तानावडे, दिलीप शिरोडकर, यशवंत साळगावकर, राजेश पेडणेकर, नितीन चिमूलकर, उल्हास साळगावकर गुरुजी शिरोडकर व अन्य मान्यवरांचे उपस्थिती होती.

# भारत सलग दुसऱ्यांदा अंडर–१९ महिला टी–२० विश्वविजेता

## दक्षिण आफ्रिकेचा ९ गडी राखून पराभव : त्रिशाने नाबाद ४४ धावा : गोंगाडी त्रिशाने घडवला इतिहास

**क्वालालंपूर, दि. २ :**



मलेशियाची राजधानी क्वालालंपूर येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या आयसीसी महिला अंडर–१९ टी–२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा ९ गडी राखून पराभव करून सलग दुसऱ्यांदा जेतेपद पटकावले. या सामन्यात टीम इंडियाची सलामीवीर गोंगाडी त्रिशाने एक मोठी कामगिरी केली. गोंगाडी या स्पर्धेत टीम इंडियासाठी सर्वात मोठी मॅच–विनर ठरली. ज्यामध्ये तिने ३०० हून अधिक धावा केल्या. यासह तिने श्वेता सेहरावतचा विक्रम मोडला.

या सामन्यात टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत ८० धावांवर गुंडाळले. भारताकडून गोंगाडी त्रिशाने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर भारतीय संघाने प्रत्युत्तरात १ गडी गमावून ११.२ षटकांत ८४ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केला. विशेष म्हणजे भारतासाठी फलंदाजीतही गोंगाडी त्रिशाने सर्वाधिक नाबाद ४४ धावांची खेळी साकारली, ज्यामुळे भारताने सलग दुसऱ्यांदा विश्वचषकावर नाव कोरले.

त्रिशाने मोडला श्वेता सेहरावतचा विक्रम

आयसीसी महिला अंडर–१९ टी–२० विश्वचषकाच्या इतिहासात एकाच हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आता गोंगाडी त्रिशाच्या नावावर नोंदवला गेला आहे. स्पर्धेत सात सामन्यात फलंदाजी करताना गोंगाडीने ७७.२५ च्या सरासरीने ३०९ धावा काढल्या. या बाबतीत, गोंगाडीने टीम इंडियाची खेळाडू श्वेता सेहरावतचा विक्रम मोडला, जिने २०२३ साली झालेल्या आयसीसी महिला अंडर–१९ विश्वचषक स्पर्धेत सात डावात ९९ च्या सरासरीने एकूण २९७ धावा केल्या होत्या. या स्पर्धेत गोंगाडीच्या बॅटमधून एक शतकी खेळी पाहायला मिळाली तर ती ३ डावात नाबाद राहून पॅव्हेलियनमध्ये परतण्यात यशस्वी ठरली. अंतिम सामन्यातही गोंगाडीने ३३ चेंडूत ४४ धावांची नाबाद खेळी साकारली.

टीम इंडियाची डावखुरी फिरकी गोलंदाज वैष्णवी शर्माने महिला अंडर–१९ टी–२० विश्वचषक २०२५ मध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्यात यश मिळवले. ज्यामध्ये तिने ६ सामन्यात ४.३५ च्या सरासरीने एकूण १७ विकेट्स घेतल्या. वैष्णवी आता आयसीसी महिला अंडर–१९ टी–२० विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेणारी गोलंदाज आहे, ज्यात तिने उपांत्य फेरीच्या सामन्यात मॅगी क्लार्कचा १२ विकेट्सचा विक्रम मोडला होता.

# रायपूरमध्ये ६ पासून लिजेंड–९० लीग सुरू होणार

## सलामीच्या सामन्यात रैना व धवन आमनेसामने, ७ संघ या स्पर्धेत खेळणार

**नवी दिल्ली, दि. २ :**



रायपूरमध्ये ६ फेब्रुवारीपासून लिजेंड–९० लीग सुरू होत आहे. ब्लॉकबस्टर स्पर्धेची सुरुवात छत्तीसगड वॉरियर्स आणि दिल्ली रॉयल्स यांच्यातील सामन्याने होईल. या सामन्यात माजी भारतीय क्रिकेटपटू सुरेश रैना आणि शिखर धवन सहभागी होणार आहेत. या स्पर्धेची विशेष बाब म्हणजे यात ९० चेंडूंचा एक डाव असेल.

७ संघ सहभागी होत आहेत. ७ रोजीपासून या स्पर्धेत दररोज २ सामने खेळवले जातील. १७ फेब्रुवारी रोजी क्वालिफायर सामने होणार आहेत. १८ फेब्रुवारीला अंतिम सामना होणार आहे. पहिला सामना राजस्थान किंग्ज आणि दुबई जायंट्स यांच्यात ७ फेब्रुवारीला होणार आहे. दुसरा सामना गुजरात संपर्मी आणि बिग बॉईज यांच्यात होणार आहे.

या कार्यक्रमाविषयी बोलताना, लिजेंड ९० लीगचे संचालक शिवेन शर्मा म्हणाले, सुरेश रैना, शिखर धवन, हरभजन सिंग यांसारख्या खेळाडूंना पुन्हा एकदा मैदानावर पाहणे ही केवळ एक स्पर्धा नाही तर माजी दिग्गजांना भेटण्याची संधी आहे त्या आठवणींना उजाळा देणारा हा एक मंच आहे ज्यावर प्रेक्षक आनंद व्यक्त करत होते.

छत्तीसगड वॉरियर्सकडे मार्टिन गुप्टिल, सुरेश रैना आणि अंबाती रायडूसारखे स्फोटक खेळाडू आहेत, तर दिल्ली रॉयल्सकडे रॉस टेलर आणि शिखर धवनसारखे अनुभवी खेळाडू आहेत. हरियाणा ग्लॅडिएटर्सचे नेतृत्व फिरकी जादूगार हरभजन सिंग करणार आहे. तर, वेस्ट इंडिजचा माजी अष्टपैलू खेळाडू ड्वेन ब्राव्हो राजस्थान किंग्जचे प्रतिनिधित्व करेल. बांगलादेशचा माजी कर्णधार शकीन अल हसन दुबई जायंट्सकडून खेळताना दिसणार आहे.

**सर्व संघ आणि खेळाडू**

**दुबई जायंट्स :** शाकिब अल हसन, थिसारा परेरा, केन्नर लुईस, केविन ओ'ब्रायन, ब्रेंडन टेलर, लियाम प्लंकेट, ड्वेन स्मिथ, एच मसाकादझा, रिचर्ड लेवी, ल्यूक फ्लेचर, राहुल यादव, ख्रिस्तोफर एम, सिड त्रिवेदी, एस प्रसन्ना.

**छत्तीसगड वॉरियर्स :** सिद्धार्थ कौल, शेल्डन जॅक्सन, पवन नेगी, केविन कूपर, सुरेश रैना, विशाल कुशवाह, मार्टिन गुप्टिल, अभिषेक सकुजा, अंबाती रायडू, अमित वर्मा, गुरकीरत सिंग मान, अमित मिश्रा, ऋषी धवन, कलीम चंदो, उन्मूद खान सिंग, अभिमन्यू मिथुन, कॉलिन डी ग्रँडहोम.

**हरियाणा ग्लॅडिएटर्स :** पवन सुयाल, प्रवीण गुप्ता, अबू नीशम, अनुरीत सिंग, इम्रान खान, असाला गुणरत्ने, इशांक जग्गी, हरभजन सिंग, नागेंद्र चौधरी, रिकी क्लार्क, पीटर ट्रेगो, चॅडविक वॉल्टन, मनन शर्मा.

**गुजरात सॅम्प आर्मी :** युसूफ पठाण, मोईन अली, ओबास पिनार, सौरभ तिवारी, केसरिक विल्यम्स, जेसल कारिया, मिगुएल कमिन्स, चंद्रपॉल हेमराज, शापूर जद्रान, मोहम्मद अश्रफुल, विल्यम पर्किन्स, नवीन स्टीवर्ट, अभिषेक, चतुरंगा डी सिल्वा, मौसीफ खान.

**बिग बॉईज :** मॅट प्रायर, इशान मल्होत्रा, मोनू कुमार, चिराग गांधी, तमीम इक्बाल, तिलकरत्ने दिलशान, हर्षेल गिब्स, उपल थरंगा, अब्दुर रज्ज़ाक, शॅनन गॅब्रिएल, वरुण आरोन, नील ब्रूम, करमवीर सिंग, रॉबिन बिस्ट, नमन शर्मा, कपिल राणा , विनोद चनवारिया.

**दिल्ली रॉयल्स :** शिखर धवन, लेंडल सिमन्स, दनुष्का गुंथिलाका, अँजेलो परेरा, सहरदा लुंबा, बिपुल शर्मा, लखविंदर सिंग, राजविंदर सिंग, रियाद इम्रत, रॉस टेलर, जेरोम टेलर, सुमित नरवाल, परविंदर अवाना.

**राजस्थान किंग्स :** ड्वेन ब्राव्हो, अंकी राजपूत, फिल मस्टर्ड, शाहबाज नदीम, फैज फजल, शादाब जकाती, जसकरण मल्होत्रा, इम्रान ताहीर, जयकिशन कोलसावाला, राजेश बिश्नोई, कोरी अँडरसन, पंकज राव, शमीउल्ला शिनवारी, रजत सिंग, शले नुसरन, ड्वेन जकाती. , मनप्रीत गोनी.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १५२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 152 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .